**D**

SL. No. : S

ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 64 ]
Total No. of Questions : 64 ]

**CCE PR**
**UNREVISED**

[ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 8
[ Total No. of Printed Pages : 8

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 08-M** **Code No. : 08-M**

# ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ
# Subject : First Language — MARATHI

**( ಹಳೆ ಪಠ್ಯಕ್ರಮ / Old Syllabus )**

**( ಪುನರಾವರ್ತಿತ ಖಾಸಗಿ ಅಭ್ಯರ್ಥಿ / Private Repeater )**

ದಿನಾಂಕ : 25. 06. 2019 ] [ Date : 25. 06. 2019

ಸಮಯ : ಬೆಳಗ್ಗೆ 09-30 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 12-45 ರವರೆಗೆ ] [ Time : 09-30 A.M. to 12-45 P.M.

ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 125 ] [ Max. Marks : 125

**विद्यार्थ्यांना सामान्य सुचना :**

1. प्रश्न पत्रिकेमध्ये बहुपर्यायी आणि वस्तूनिष्ठ प्रकारचे 64 प्रश्न आहेत.

2. प्रश्न पत्रिका विरुद्ध बाजूच्या आच्छादनाने सील ( बंद ) करण्यात आली आहे. परोक्षा सुरू झाल्यावर उजव्या बाजूने कापून तुम्हाला ती उघडावयाची आहे. प्रश्न पत्रिकेमधील सर्व प्रश्न व्यवस्थित आहेत की नाहीत ते तपासून पाहा.

3. बहूपर्यायी आणि वस्तुनिष्ठ या दोन्ही प्रकारच्या प्रश्नासाठी दिलेल्या सुचनांचे पालन करा.

4. उजव्या बाजूच्या कडेला ( काठावर ) असलेली संख्या पूर्ण गुण दर्शविते.

5. पेपरची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्न पत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्न पत्रिका वाचण्यासाठो 15 मिनिटेही दिलेली आहेत.

येथून कापा.

**TEAR HERE TO OPEN THE QUESTION PAPER**
प्रश्न पत्रिका येथून कापून उघडा.

Tear here

## विभाग-A

### ( गद्य पद्यांशावर आधारीत )

I. खालील प्रश्नांची प्रत्येकी **एका** वाक्यात उत्तरे लिहा : $16 \times 1 = 16$

1. पोट पाहणाऱ्यास हत्ती कसा वाटला ?
2. सर्वज्ञ असे कोणाला म्हटले आहे ?
3. 'हकिकत' पाठाचा वाङ्मय प्रकार कोणता ?
4. रा. रं. बोराडे यांची पुरस्कार मिळालेली लघुकादंबरी कोणती ?
5. आईने थळोबास कोणता नवस केला ?
6. 'आई समजून घेताना' पाठाचे मूल्य कोणते ?
7. 'स्वरगगा' असे कोणाला म्हटले आहे ?
8. गंगुबाईंचे निधन केव्हा झाले ?
9. मुकुंदराजनी लिहिलेला मराठीतील पहिला काव्यग्रंथ कोणता ?
10. रुक्मिणीचा विवाह कोणाशी निश्चित करण्यात आला होता ?
11. आळी कशामुळे दणाणून जाईल ?
12. वसईवर कोणाचा अंमल होता ?
13. गुलजार यांचे पूर्ण नाव काय ?
14. कवी यशवंत यांनी लिहिलेल्या महाकाव्याचे नाव सांगा.
15. 'सत्कार' कविता कोणत्या काव्यसंग्रहातून निवडली आहे ?
16. कोणत्या वाटेवर काटे टोचतात ?

II. खालील प्रश्नांची उत्तरे **तीन-चार** वाक्यात लिहा : 13 × 2 = 26

17. चिं. वि. जोशींचा परिचय लिहा.

18. लेखकाच्या मित्राकडे जेवणाचा कोणता बेत केला होता ?

19. वाटणीच्या घोळाने घरात काय घडत होते ?

20. संत ज्ञानेश्वरांचा परिचय लिहा.

21. जातील कधी हे आई ? घरदार न यांना काही ? ससंदर्भ स्पष्ट करा.

22. सगळे ऋतु त्या स्त्रियांसाठी काय आणतात ?

23. 'अनंतशक्ती परमेश्वरू' कथेचे तात्पर्य कोणते ?

24. 'आजीबाई' म्हणून हाक मारताच काकू रागाने काय म्हणाल्या ?

25. जपानमध्ये कोणते निरुद्योगी प्रकार आढळत नाहीत ?

26. गंगुबाईना कोणकोणते पुरस्कार मिळाले होते ?

27. शिशुपालाच्या रक्षणासाठी कोण-कोण आले आहेत ?

28. ढोंगी गुरु काय काय करतो ?

29. पाहुणे कोठून आले आहेत असे आई मुलाला सांगते ?

III. खालील प्रश्नांची उत्तरे **पाच-सहा** वाक्यात लिहा : 10 × 3 = 30

30. फिरंग्याने श्रीमंताकडे कोणता तह केला ?

31. संकटांना आंबेडकरांनी कशाच्या जोरावर तोंड दिले ?

32. पावसाळ्याचा हिशेब लेखकाने कसा घातला आहे ?

33. 'मदर्स युनियन' या संस्थेची माहिती लिहा.

34. हरि कोणावर फिदा आहे ? होमामध्ये काय काय जाळतात ?

35. कवीने कृष्ण, कर्ण, सौभद्र यांचे दाखले का दिले आहेत ?

36. धुळीचेच आहे मला भूषण असे पृथ्वी का म्हणत आहे ?

37. 'धरण' कवितेतील स्त्रीच्या गरिबीचे वर्णन करा.

38. लेखकाबरोबर भांडण झाल्यावर आई काय म्हणे ?

39. सद्‌गुरु कसा असावा असे मुकुंदराजना वाटते ?

IV. खालील प्रश्नांची उत्तरे **आठ-दहा** वाक्यात लिहा : 5 × 4 = 20

40. जांभूळ, पिंपळ, कडुनिंब या झाडांविषयी गुलजारांनी काय सांगितले आहे ?

41. टिटवं घेऊन जाताना सावित्रोबाईंना कोणत्या गोष्टी आठवत होत्या ?

42. 'सत्कार' कवितेचा सारांश लिहा.

43. भारत कशा प्रकारे असावा अशी संत तुकडोजींनी अपेक्षा केली आहे ?

44. पुढील कवितेच्या ओळी पूर्ण करा –

सदाशिव हाकारतो .....................................................

.......................................................................

.......................................................................

........................................................ राघुची पाहते.

## विभाग-B

### ( व्याकरणावर आधारीत )

V. खालील पर्यायातून योग्य उत्तर निवडून लिहा : 10 × 1 = 10

45. 'मनोरंजन' ही संधी अशी सोडवतात.

(अ) म + नोरंजन (ब) मनो + रंजन

(क) मनो + अंजन (ड) मनः + रंजन.

46. खालीलपैकी षष्ठी विभक्तीचे प्रत्यय

(अ) त, ई, आ (ब) स, ला, ते

(क) चा, ची, चे (ड) ने, ए, शी.

47. 'शिक्षकानी विद्यार्थ्यांना शिकवावे.' हे या प्रयोगाचे उदाहरण आहे.

(अ) कर्तरी (ब) भावे

(क) कर्मणी (ड) यापैकी नाही.

48. 'मी चंद्रावर जाईन.' या वाक्यातील काळ

(अ) भविष्य काळ (ब) भूतकाळ

(क) वर्तमान काळ (ड) रिती भूतकाळ.

49. 'कुठेही जा, पळसाला पाने ...........' म्हण पूर्ण करा.

(अ) तीनच (ब) चार

(क) दोन (ड) पाच.

50. 'तू कोणत्या गावी जाणार आहेस ?' या वाक्याचा प्रकार

(अ) आज्ञार्थी (ब) प्रश्नार्थक

(क) उद्गारवाचक (ड) विधानार्थी.

51. 'भाजीपाला' हे या समासाचे उदाहरण आहे.

(अ) द्विगू (ब) अव्ययीभाव

(क) समाहार द्वंद्व (ड) बहुव्रीही.

52. 'रात्री प्रकाशणारा किडा' शब्दसमूहाला एक शब्द

(अ) कारवा (ब) काजे

(क) काजू (ड) काजवा.

53. ती <u>दररोज</u> चालते. अधोरेखित शब्दाची जात

(अ) क्रियापद (ब) विशेषण

(क) नाम (ड) क्रियाविशेषण.

54. 'हापूस' हा शब्द या भाषेतून मराठीत आला आहे.

(अ) कन्नड (ब) इंग्रजी

(क) पोर्तुगीज (ड) संस्कृत.

VI. खालील दोन शब्दातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा शब्द लिहा : $4 \times 1 = 4$

55. माय : माता : : पक्षी : .............

56. उजेड : अंधार : : न्याय : .............

57. प्रश्नार्थक : ? : : दुहेरी अवतरण : .............

58. मोर : लांडोर : : श्रीमान : .............

VII. सूचनेप्रमाणे खालील प्रश्नांची उत्तरे लिहा : $3 \times 2 = 6$

59. 'झाले बहु, आहेतही बहु, परंतु या सम हा.'

अलंकार ओळखून लक्षणे लिहा.

60. "मराठी असे आमुची मायबोली, जरी भिन्न धर्मानुयायी असू"

गण पाडून वृत्त ओळखा.

61. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा :

i) डोळे मिटणे

ii) जीव घाबराघुबरा होणे.

## विभाग-C

### ( लेखन व रचनेवर आधारित )

VIII. 62. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर कल्पनेचा विस्तार करा : $1 \times 3 = 3$

i) प्रयत्नांती परमेश्वर

ii) सत्यमेव जयते.

IX. 63. महानगरपालिकेतील लिपिक पदासाठी नोकरीचा अर्ज लिहा. $1 \times 5 = 5$

**किंवा**

तुमच्या भावाने राज्यस्तरीय भाषण स्पर्धेत मिळविलेल्या यशाबद्दल त्याचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

X. 64. खालीलपैकी **एका** विषयावर **15** ते **20** ओळीत निबंध लिहा : $1 \times 5 = 5$

i) मोबाईल – शाप की वरदान

ii) माझा आवडता समाज सुधारक

iii) राष्ट्रीय एकात्मता.